बृहन्मुंबई महानगरपालिका

घन कचरा व्यवस्थापन,पी/दक्षिण

सहा.अभि.(घकव्य)/ 6529 /पी/दक्षिण दिनांक 05/11/2026

जाहिर सुचना

पी/दक्षिण विभागातील बामनवाडी, लोधा बिल्डिंगजवळ,गोरेगाव(पूर्व) येथे मनपामार्फत लॉट-12 अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाचे शौचालयाचे ०३ महिने किंवा सीबीओ संस्थेच्या निवडीबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे आधी होईल, तोपर्यंत "**ना नफा ना तोटा"** या तत्वावर प्रचालन व परिरक्षण करण्याकरीता स्थानिक अशासकिय संस्थेची नेमणूक करण्याकरीता इच्छुक असलेल्या अशासकीय संस्थांकडून अर्ज मागविण्याकरीता. तसेच पात्र संस्थांमधून **सोडत पद्धतीने** ०१ संस्थेची निवड करण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे.

अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्रे व पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे असतील.

1. विषयांकित ठिकाणावरील शौचालयाचे प्रचालन व परिरक्षण करण्याकरीता संस्था स्थानिक असावी.
2. नोंदणीकृत सोसायटी अथवा ट्रस्ट, अथवा नोंदणीकृत भागीदारी संस्था, नोंदणीकृत कंपनी किंवा खाजगी व्यक्ती / नोंदणीकरण प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.
3. अर्जदार संस्थांकडे त्यांनी स्वत: किंवा त्यांच्या एजन्सीद्वारे केलेल्या नोंदणीकृत कंपनीच्या प्रकरणामध्ये मेमोरेंडम ऑफ़ आर्टिकल्स असोसिएशन किंवा सोसायटी किंवा ट्रस्ट्च्या प्रकरणामध्ये नोंदणीच्या प्रमाणपत्रासह उपविधीची प्रत जोडावी.
4. संस्थेचे सभासद/मालक/भागीदार/संचालक/मुखत्यार/कंपनीधारकांच्या सभासदांचे स्वाक्षरीसह पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे, दुरध्वनी क्रमांक, पॅन कार्ड, ई-मेल आणि त्यांचे राहण्याचे पत्ते इ. माहिती रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन त्याची मुळ प्रत जोडावी.
5. मागील तीन वर्षाची उलाढाल दर्शविणारी बँक खात्याची सक्षम लेखा परिक्षकाने तपासलेली प्रत जोडावी.
6. अर्जदार संस्थेच्या जबाबदार पदाधिका-याचे स्वाक्षरीने प्रसाधनगृह कोणत्याही इतर संस्थेस चालवण्यास देण्यात येणार नाही किंवा त्यासंबंधी करारनामा करता येणार नाही असे प्रतिज्ञापत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस लिहून देणे बंधनकारक राहिल व अर्जासोबत जोडणे बंधनकारक असेल.
7. काळया यादीत समाविष्ट असलेल्या संस्थेस बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तसेच मनपाच्या कोणत्याही योजनेमध्ये सहभाग घेता येणार नाही व त्यांचे अर्ज अप्रतिसादी समजण्यात येतील.
8. अर्जदार संस्था अर्ज करण्यापुर्वी सर्व आवश्यक बाबी, अर्जासोबतचे कागदपत्राची खातरजमा करतील आणि अर्ज सर्व बाबींनी परिपुर्ण आहे याची खात्री करतील.
9. काम सुरु करण्यासाठी विविध प्राधिकरणांकडून आवश्यक असणाऱ्या अधिकृत मंजुरी प्राप्त करण्यासाठी अर्जदार संस्था संबंधित प्राधिकरणाकडे पाठपुरावा करतील.
10. संस्थेने अर्ज सादर करण्यापुर्वी कागदपत्रांची संपुर्ण आणि काळजीपुर्वक तपासणी केलेली आहे. तसेच प्रसाधनगृहाच्या प्रस्तावासंबंधी सर्व माहिती प्राप्त केलेली आहे असे समजण्यात येईल.
11. निवड झालेल्या अशासकीय संस्थेला सदर शौचालयामध्ये जल जोडणी, विज जोडणी व इतर आवश्यक बाबी स्वतः करावयाच्या आहेत.

12. सदर प्रसाधनगृहाचे प्रचालन व परिरक्षण करीत असताना वीज देयके व जल देयकांचा खर्च निवड झालेल्या अशासकीय संस्थेला स्वतः करावयाचा आहे.
13. सदर शौचालयाचे प्रचालन लॉट-१२ च्या निविदेतील अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.
14. सदर शौचालयाचे प्रचालन व्यवस्थितरित्या नाही झाल्यास संस्थेस पूर्वसुचना न देता मनपाच्या ताब्यात घेण्यात येईल.

इच्छुक संस्थांनी आपले अर्ज **दिनांक 06/11/2026 ते दिनांक 16/11/2026** रोजी दुपारी 1:00 वाजेपर्यंत खालील पत्त्यावर जमा करावे.

<u>कार्यालयाचा पत्ता</u>
सहा.अभि.(घकव्य)यांचे कार्यालय
पी/दक्षिण विभाग कार्यालय
सी.टी एस .क्र. ७४६, व्हिलेज पहाडी,
स्वामी विवेकानंद मार्ग, गोरेगाव (प)
मुंबई -४०० १०४,

सही/-
सहा.आयुक्त (पी/दक्षिण)